शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना टेरिकॉटचा गणवेश देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: सीएलओ-१०८३/२५१४/२९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ सप्टेंबर १९९०.

वाचा:- [१] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:सीएलओ-१०७९/२९, दिनांक ११ जून, १९७९.

[२] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: सीएलओ-१०८१/७४२२/२९, दिनांक ११ सप्टेंबर १९८१.

[३] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:सीएलओ-१०८२/२३४५/२९, दिनांक ३० नोव्हेंबर १९८२.

[४] शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: सीएलओ-१०८१/१६४६/२९, दिनांक ५ डिसेंबर १९८३.

शासन निर्णय :- शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना सध्या देण्यात येणा-या खादीच्या गणवेषाऐवजी टेरिकॉट कापडाचा गणवेष देण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन हो[ता] त्या संबंधी सर्वांगीण विचार करून शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, सन १९९०-[९१] या आर्थिक वर्षापासून ज्यावेळी गणवेष बदलावयाचे असतील त्यावेळी गणवेषास पात्र असलेल्या शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना टेरिकॉट कापडाचा खालीलप्रमाणे गणवेष देण्यात यावा.

| गणवेष [१] | गणवेषाचा रंग [२] | टेरिकॉट कापडाची प्रत [३] | कापडाची रुंदी [पन्हा] [४] | कापडाचे सरासरी प्रमाण [लांबी] [५] | कालावधी [६] |
|---|---|---|---|---|---|
| पुरुष कर्मचारी | | | | | |
| ३ अर्ध्या बाहयांचे बुशशर्ट | खाकी | ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन | ८९ सें.मी. | २ मीटर[प्रति शर्ट] | २ वर्षांसाठी |
| ३ लांब विजारी | खाकी | ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन | १३८ सें.मी. | १.३० मीटर [प्रति विजार] | २ वर्षांसाठी |
| स्त्री कर्मचारी | | | | | |
| ३ साडया | फिकट निळया रंगाच्या व काळी किनार असलेल्या | ६७% पॉलिस्टर ३३% कॉटन | ११८ सें.मी. | ५ मीटर[प्रत्येक साडी] | २ वर्षांसाठी |
| ३ ब्लाउज | फिक्कट निळा | ४८% पॉलिस्टर ५२% कॉटन | - | ८० सें.मी.[प्रत्येक ब्लाउज] | २ वर्षांसाठी |

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
- 3 OCT 1990
९४२९५

[२]. गणवेषाचे कापड घेण्यासाठी प्रत्येक कार्यालय प्रमुख त्यांचे कार्यालयातील प्रत्येक चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना गणवेषासाठी किती कापड आवश्यक आहे त्यासंबंधी चौकशी करतील व त्यानुसार परिच्छेद १ मधील विहित सरासरी प्रमाणापेक्षा ते जास्त होणार नाही यासंबंधी खात्री करून संचालक, मुद्रण व लेखन सामुग्री संचालनालय, मुंबई यांचेकडे एकूण कापडासाठी मागणीपत्र सादर करतील. संचालक, मुद्रण व लेखन सामुग्री त्यांचेकडे नोंदविण्यात आलेल्या मागणीनुसार निविदा मागवून कापडाची खरेदी करतील व मागणी केलेल्या कार्यालयांना पुरवितील. अशी खरेदी करताना महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ, तुरुंग विभाग यांसारख्या शासकीय संस्था/सार्वजनिक उपक्रमांकडून शासनाच्या धोरणानुसार कापड विकत घेण्यात यावे.

कार्यवाही करावी. शिलाईवरील खर्चासाठी पुरुष कर्मचा-यांच्या गणवेशाच्या प्रत्येक जोडासाठी राज्यातील महानगरपालिका क्षेत्रामध्ये रु. १००/- फक्त व राज्यातील इतर सर्व ठिकाणी रु. ८०/- फक्त एवढी, तसेच स्त्री कर्मचा-यांच्या प्रत्येक ब्लाऊजच्या शिलाईसाठी रु. २०/- फक्त एवढी कमाल मर्यादा याव्दारे निश्चित करण्यात येत आहे. क्वचित प्रसंगी शासकीय कर्मचारी गणवेष स्वत: शिवून घेत असल्यास, निर्देशाने ठरविलेल्या दरापेक्षा जास्त रकमेची प्रतिपूर्ती त्यास देता कामा नये.

४. शासन असेही निदेश देत आहे की, दिनांक ११ सप्टेंबर १९८१ च्या शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: सीसीओ-१०८१/३४२२/२९ अन्वये निर्धारित करण्यात आलेल्या व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: सीसीओ-१०८२/२३४५/२९, दिनांक ३० नोव्हेंबर १९८२ अन्वये मुदतवाढ दिलेल्या धुलाई भत्त्यासंबंधीचे आदेश यापुढेही पुढील आदेश होईपर्यन्त अंमलात राहतील.

५. टेरिकॉट कापड व साड्या खरेदीसाठी होणारा खर्च उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावा. गणवेष शिलाईसाठी होणारा खर्च संबंधित कार्यालयांनी त्यांच्या मंजूर अनुदानातून भागवावा.

६. हा निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: बीआर-१०१५/व्यय-४, दिनांक १७ सप्टेंबर १९९० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ल. आ. कावड,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
राज्यपाल यांचे परिवार प्रबंधक,
मुख्य मंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव व स्वीय सहाय्यक,
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखाकार, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग [व्यय-४],
सामान्य प्रशासन विभाग [कार्यासन २१ आणि १९].

---

२४।११।९० 

एफ-८५०[४०००-९-९०]-अ.

क्र. ससाशा-संकीर्ण-कावि-९०६
जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी दि. ६।१०।९०

प्रत- माहितीसाठी-
१) उपविभागीय अधिकारी दापोली चिपळूण रत्नागिरी
२) तहसिलदार मंडणगड, दापोली, खेड, गुहागर, चिपळूण संगमेश्वर, लांजा राजापूर, रत्नागिरी,
३) विशेष गृ. संपादन अधिकारी (को. कृ. वि) दापोली
४) ~~लेखाशाखा जिल्हाधिकारी कार्यालय रत्ना.~~

जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता